10 DEC 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यस्तरीय ज्यूदो स्पर्धेला प्रारंभ

## ३०० हून अधिक खेळाडू सहभागी; राज्य संघ निवडणार



कोल्हापूर : ४९ व्या राज्यस्तरीय ज्युनिअर ज्यूदो स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. धनंजय भोसले, दत्ता आफळे, रवी मैतकर, योगेश घाडवे, चंद्रशेखर साखरे, वीरधवल पाटोळे आदी.

**कोल्हापूर, ता. १० :** ४९ व्या राज्यस्तरीय ज्यूदो स्पर्धेला शिवाजी विद्यापीठातील दीक्षांत समारंभ हॉलमध्ये प्रारंभ झाला. राज्यभरातील ३०० हून अधिक खेळाडूंचा स्पर्धेत समावेश असून, कोल्हापूर ज्यूदो असोसिएशनला यंदा स्पर्धा संयोजनाचा बहुमान मिळाला आहे.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचा दिमाखदार प्रारंभ झाला. दरम्यान, ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडियातर्फे ज्युनिअर गटाच्या राष्ट्रीय स्पर्धा रांची (झारखंड) येथे होणार आहेत. त्यासाठी महाराष्ट्राच्या संघाची निवड या स्पर्धेतून होणार आहे.

महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. धनंजय भोसले, टेक्निकल चेअरमन दत्ता आफळे, खजिनदार रवी मैतकर, स्पर्धा संचालक स्मिता शेट्टी, 'साई'चे संचालक योगेश घाडवे, जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रशेखर साखरे, जिल्हा ज्यूदो असोसिएशनचे सचिव अण्णासाहेब पाटोळे, सहसचिव वीरधवल पाटोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. समीर लिंग्रस, वृषाली लिंग्रस यांनी स्वागत केले. शरद पोवार यांनी सूत्रसंचालन केले. अमोल देसाई, संतोष बाबर आदी य वेळी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे झालेल्या आविष्कार संशोधन स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करताना प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

# शाश्वत विकासासाठी शिवचरित्र अभ्यासा

## डॉ. शिंदे : 'आविष्कार'मधील विजेत्यांचा सत्कार

कोल्हापूर, ता. १० : 'छत्रपती शिवाजी महाराज यांनी शाश्वत विकास त्यांच्या कृतीतून दाखवला असून, त्यावर विद्यार्थ्यांनी संशोधन करावे', असे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीतर्फे आयोजित आविष्कार संशोधन स्पर्धेमधील विजेत्यांच्या सत्कारप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते विजेत्यांचा सत्कार झाला. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. डॉ. शिंदे म्हणाले, ''शाश्वत विकास कसा असतो, हे पाहायचे असेल तर शिवरायांच्या चरित्राचा अभ्यास करावा.

सर्व घटकांना न्याय देताना शिवरायांनी पर्यावरणाची काळजी घेतली. त्याचबरोबर रयतेतील प्रत्येक घटकातील कौशल्याचा स्वराज्यासाठी वापर केला.'' स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक प्रा. किरणकुमार शर्मा यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. किरण डी. पवार यांनी सूत्रसंचालन केले. प्रमोद जे. पाटील यांनी आभार मानले.

10 DEC 2022 सकाळ

जनसपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नवसाहित्य' ग्रंथ संशोधनाला दिशा देणारा : राजन गवस

कोल्हापूर, ता. १० : पंडित टापरे यांचा 'नवसाहित्य : एक अभ्यास' हा ग्रंथ नव्याने संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाची नवी दिशा देणारा आहे. नवसाहित्यावरील एक महत्त्वाचा संदर्भ म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाईल, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले. या ग्रंथाचे प्रकाशन आणि चर्चासत्र कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : नवसाहित्य पुस्तकाच्या प्रकाशनाप्रसंगी नंदकुमार मोरे, नितीन रिंढे, राजन गवस, डॉ. डी. टी. शिर्के, पंडित टापरे, सुनीताराजे पवार, रणधीर शिंदे आदी.**

मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. चर्चासत्राची भूमिका प्रा. शिंदे यांनी मांडली. या वेळी डॉ. गवस म्हणाले, "आपण लिहिलेले पुस्तक रूपाने यावे यासाठी लोक चार दिवसांचीही वाट पाहायला तयार नाहीत. अशा काळात टापरे चाळीस वर्षे थांबतात, त्यावर सातत्याने मनन चिंतन करतात हेही सर्वांनी शिकण्यासारखे आहे." कुलगुरू प्रा. शिर्के म्हणाले, "मराठी संशोधनामध्ये पंडित टापरे यांचा हा ग्रंथ एक महत्त्वाचे प्रात्यक्षिक आहे. नवीन संशोधक विद्यार्थ्यांनी अशाप्रकारचे मूलभूत संशोधन करणे, ही आजची गरज आहे." याप्रसंगी ग्रंथाचे लेखक डॉ. पंडित टापरे यांनी या ग्रंथाविषयी आपली भूमिका मांडली. ग्रंथ प्रकाशनानंतर झालेल्या चर्चासत्रात ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे आणि प्रा. नितीन रिंढे यांनी विषयाच्या अनुषंगाने सविस्तर मांडणी केली. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. या वेळी प्रकाशक सुनीताराजे पवार, माजी विभागप्रमुख विश्वनाथ शिंदे, ज्येष्ठ लेखक सुनीलकुमार लवटे यांच्यासह मराठी विविध विषयांचे सुमारे दीडशे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठात उद्या लोकसंस्कृती कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. १० :** शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्राच्या वतीने सोमवारी (ता. १२) सकाळी ११ वा. वि. स. खांडेकर भाषाभवन येथे 'लोकविद्या आणि लोकसंस्कृती : अभ्यास आणि संवर्धन' विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतील महाविद्यालयातील समन्वयक कार्यशाळेत सहभागी होणार आहेत. महाविद्यालयांच्या पातळीवर लोककला, लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याचे संकलन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने 'लोकविद्या आणि लोकसंस्कृती : अभ्यास आणि संवर्धन' हा बृहद प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे कार्य गतिमान करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील असतील. चर्चासत्रात डॉ. मुकुंद कुळे (मुंबई) व डॉ.नीला जोशी, (कागल) मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा.(डॉ.) नंदकुमार मोरे यांनी केले आहे.